हातात दिली. ते गेल्यावर चिठ्ठी वाचली. तीत असे लिहिले होते आपण गावी येऊ नये, आमची भानगड समेटाने मिटली. कोणी विश्वास ठेवा अगर ठेवू नका पण मला स्वतःला श्रीबाबांचे बद्दल अनुभव बरेच आलेले आहेत. ते दिल्यास माझेच एक पुस्तक तयार होईल म्हणून आता पुरे. मात्र एकच सांगतो—

साधकाची निष्ठा आणि भावना असल्याशिवाय परमात्मा दिसणार नाही हे सत्य होय.

# बाबांची प्रार्थना केली अन् आजार दूर पळाला

—श्री. श्रीराम सातर्डेकर
विजित निवास, परळ मुं. १२

● श्रीसाईबाबांची ५० वी पुण्यतिथी १९६८ साली शिर्डीत मोठ्या थाटामाटात साजरी करण्याचे आयोजिले होते. त्यानुसार ९ दिवस अगोदर शिर्डीत नवरात्रोत्सवापासून कार्यक्रमांची आखणी केली होती. संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित केले होते. मी प्रत्येक उत्सवाला शिर्डीस १९४५ सालापासून जात आहे. तेव्हा त्यावेळीही पुण्यतिथीच्या उत्सवाला हजर राहाण्यासाठी मी १५ दिवसांची रजा घेतली होती. उत्सव २३–९–६८ पासून सुरू होणार होता. परंतु दि- ८–९–६८ पासून माझी मोठी मुलगी चि. प्रतिभा तापाने आजारी झाली. दिवसेंदिवस ताप वाढतच होता. डॉ. चिंतामण वाघ यांची ट्रिटमेंट चालू होती. आणखी दुसऱ्या दोन मुलांना व सौ. लाही ताप येवू लागला. शेवटी डॉक्टरांना घरी आणावे लागले. इतर आजारी पाहून डॉक्टरांनी सांगितले की, या मुलीला तुम्ही आर्थररोड हॉस्पीटलमध्ये घेवून जा! आता ३ बिछानेच पडलेत, ६ बिछाने घालावे लागतील. मला हे डॉक्टरांचे रागाचे शब्द ऐकून अत्यंत वाईट वाटले. प्रतिभाच्या तापाचा तो १४ वा दिवस होता. माझे सर्व लक्ष शिर्डीच्या कार्यक्रमाकडे लागले होते. उद्यापासून बाबांचा उत्सव सुरू होईल, आणि मी मात्र इकडे असा संकटात सापडलो आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीप्रमाणे हॉस्पीटलमध्ये चि. प्रतिभाला न्यायलाच हवे. मी बाबांना सांकडे घातले की, बाबा! तुमची परीक्षा मी काय घेणार! माझी मनःस्थिती तुम्ही जाणतच आहात! किती माझा तुम्ही अंत पाहाणार! शिर्डीतील तुमच्या सोहळयाकडे माझे डोळे लागले आहेत आणि मुलीला डॉक्टरांनी हॉस्पीटलमध्ये न्यायला सांगितले आहे! माझी इच्छा हॉस्पीटलमध्ये न्यायची नाही. तेव्हा तुम्हीच काय तो मार्ग दाखवा! त्याच रात्री २ वाजता चि. प्रतिभाने

मला स्वतः होऊन हाक मारली की, दादा! माझे अंग ओले झाले आहे. खरोखरच तिला घाम येवू लागला होता व गेले १४ दिवस तापाने फणफणणारी अर्धवट शुद्धीत असणारी प्रतिमा पूर्ण शुद्धीत आली होती. श्रीबाबांनी माझी करुणा ऐकली होती. सकाळी ती हुशार वाटली. त्या दिवशी डॉ. बाघांकडे न जाता डॉ. श्री. खांडेपारकर यास घरी आणले. त्यांना प्रकृती दाखविली. सर्व हकीकत कळविली. त्यांनी सांगितले की, हॉस्पीटलमध्ये नेण्याचे काही कारण नाही. व्यवस्था उत्तम आहे. अर्ध्या तासाने टेम्परेचर घ्या आणि चार्ट तयार ठेवा. नियमित औषध घ्या! त्याप्रमाणे २ दिवस औषध देताच चि. प्रतिभा स्वतः होवून म्हणू लागली की दादा! तुम्ही श्रीबाबांच्या उत्सवास का जात नाही? उत्सव तर कालपासून सुरू झाला. मी तिला म्हणालो की, तू इतकी आजारी असता मी कसा जाणार! त्यावेळी ती म्हणाली की, मी आता पूर्ण बरी आहे. थोडासा अशक्तपणा आहे. तरी तुम्ही जा! शेवटी डॉ. श्री. खांडेपारकराना विचारले व तिसऱ्या दिवशी मी शिर्डीस गेलो. पहिले दोन दिवस अतिशय पावसामुळे कार्यक्रमच झाले नव्हते! त्यानंतर (दसऱ्यानंतर) मुंबईत श्रीसाईबाबांच्या पादुका आल्या! त्यावेळी परळला झेविअर कॉलेजच्या ग्राऊंडवर त्यांची स्थापना केली होती. चि. प्रतिभा पहाटे पहिल्या आरतीपासून ते रात्री शेजारतीपर्यंत त्या प्रति शिर्डीत श्रीबाबांच्या सान्निध्यात राहात होती. घरची मोठी माणसं म्हणायची की, ती नुकतीच आजारातून उठली आहे. तरी तिला विश्रांतीची जरूर आहे. श्री बाबांची सेवा, त्यांचा निकट सहवास हीच विश्रांति! तिची प्रकृति उत्तम झाली. ही सर्व श्रीबाबांचीच कृपा! श्रीबाबा नेहमी हाक मारताच आमच्यावरील संकटे आपल्या कृपाकटाक्षाने आतापर्यंत दूर करीत आहेत!

# भांडण आणि उदी

— पांडुरंग भुजबळ
सोमवार पेठ, सातारा

श्री सद्गुरु साईबाबांनी आपल्या आयुष्यात पुष्कळ लोकाना त्यांचे उदीने संकट-मुक्त केले आहे व अजुनही मुक्त होत आहेत. याचे बरेच अनुभव आमच्या श्री साईबाबांचे ठाण्यावर येत आहेत. त्यापैकी एक अनुभव मी साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी देत आहे.

आमचे येथे एक वरीष्ठ अधिकारी आहेत, त्यांचे घरी नोकर चाकर आहेत. अधिकाऱ्याची पत्नी अत्यंत श्रद्धाळू व अत्यंत निष्ठावान साईभक्त आहे व त्यांना

श्री साईबाबांच्या लीला ऐकावयास मिळाल्या म्हणजे त्या तासनतास जागेवरून मला उठू देत नाहीत. पण कोणत्याही गोष्टीस मर्यादा असतात म्हणून आवरते घ्यावे लागते. एके दिवशी त्यांचे घरातील स्त्री नोकराणीचे व त्यांचे काही कारणाने बिनसले व त्यांनी त्या बाईस कामावरून कमी केले. ती बाई म्हणजे पूर्वी त्यांचे सर्व घरात वावरत होती; व ती स्वयंपाकघरात मदत करावयाची असा तिचा त्या घरात अत्यंत सलोख्याचा असा वावर होता. ती बाईसाहेबांशी अत्यंत प्रेमळ व आनंदाने घरात वावरत होती. अशी परिस्थिती असताना एकदम तिला कामावरून कमी केले. त्यामुळे तिला रोज अधिकाऱ्यांचे घरात खाण्यास मिळणाऱ्या पदार्थांची आठवण होऊन तिचा आत्मा त्या गोड स्वादिष्ट पदार्थांची सारखी आस करू लागला. पण आता काम सुटल्यामुळे ते स्वादिष्ट पदार्थ पहाण्यास मिळणे कठीण. तर खावयास कोठून मिळणार अशी तिची अवस्था झाली. तिचा जिवंत आत्मा तडफडू लागला व काय आश्चर्य ह्या बाईसाहेबांना रात्री झोपताना लवकर झोप लागायची पण रात्री १-३० पुढे त्यांना एकट्याना भयंकर खमंग अशा पदार्थांचे वास येवू लागले. त्या जाग्या होत व घरात पहात तर कोणीच नाही. आणि हे असे खमंग स्वदिष्ट पदार्थांचे वास कसे काय येतात हे कळेना. असे ७-८ दिवस गेले. रोज रात्री दिड चे पुढे त्यांना सारखा खमंग वास येवू लागेल. त्यांनी घरातील लोकाना जागे केले. तर त्याना काही वास येत नसत. उलट त्या सर्वांना त्यांनी वेड्यात काढले. पण हे सर्व होत असताना त्यांना काही हा त्रास कमी होईना. त्यांना सारखा मानसिक त्रास होऊ लागला. रात्रभर जागरण होऊ लागले, त्यामुळे त्या फार त्रासून गेल्या, आणि मग त्यांनी मला बोलावणे पाठविले. मी त्यांचे भेटीस त्यांचे घरी गेलो. त्यावेळी त्यांनी वरील सर्व वृत्तांत सांगितला. मी त्यांना श्रीसाईबाबांचे आमचे सोमवार पेठेतल्या घरी गुरुवारी येण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या गुरुवारी संध्याकाळी ६—३० वा. श्रीसाईबाबांचे आरतीचेवेळी आल्या. आरती झाल्यावर मग मी श्री साईबाबांपुढे त्यांची तक्रार मांडली. त्यावेळी श्रीबाबांनी माझे मुखातून वदवले की तुमचे घरी तुमचे आणखीन् कोणा नोकराचे भांडण तंटा झाला आहे का असे विचारले. त्यावर त्यावेळी त्यांचे लक्षात आले नाही. पण थोडा विचार करताच त्यांनी आपण आपली कामवाली बंद केल्याचे सांगितले. ती स्वयंपाकघरात सर्व कामात मदत करीत होती. त्यावर उपाय म्हणून श्री साईबाबांनी माझे मुखातून वदवले की तुमचा अत्यंत आवडता पदार्थ तुम्ही शनिवारी संध्याकाळी ६-३० वा तयार करा. त्यात ही श्री साईबाबांची उदी वर टाका, व तो पदार्थ व उदबत्ती हे दोन्ही तुमचे अंगावरून तीन वेळा उतरा व ती बाई ज्या रस्त्याने तिचे घरी जाते त्या ठिकाणी ठेवा म्हणजे हा तुमचा होणारा त्रास अजिबात कमी होईल. त्याप्रमाणे बाईसाहेबांनी त्यांचा अत्यंत आवडता पदार्थ कांदेपोहे अगदी चमचमीत तयार केले. त्यावर श्री साईबाबांची उदी टाकली व उदबत्ती घेऊन त्यांचे अंगावरून तीन वेळा उतरले व ते त्या बाईचे घरी

झोपण्याचे मार्गावर ठेवले आणि काय आश्चर्य त्याच रात्रीपासून त्यांना झोपेत अजिबात कसलाही त्रास येणे बंद झाले व त्यांना शांत झोप येऊ लागली व त्यापासून त्या बाईंचा आता कोणताही त्रास त्यांना होत नाही. त्या आता समाधानी, आनंदी आहेत. ती मोलकरीणही दुसरीकडे काम करीत आहे. थोडक्यात म्हणजे जिवंत माणसांच्या इच्छा कशा माणसांच्या मागे लागतात व त्यांना झोपेत त्रास देतात. पण ह्याही गोष्टीवर श्री साईबाबांनी आपल्या उदीचा प्रभाव दाखवून त्या बाईंना होणाऱ्या त्रासातून मुक्त केले. ही साधी गोष्ट नाही. पिशाच्च्यावर उदीचा प्रभाव पडतोच पण जिवंत आत्म्यावरही त्याचा अगदी सहज प्रभाव पडून माणूस संकटमुक्त होतो.

जो श्री साईबाबांचे अगदी निष्ठेने चिंतन करुन त्यांच्य उदीचे सेवन करीतो त्याला यश हमखास मिळते असा अनुभव अनेकाना आहे. तसा आमच्याही अनेक भक्तांना आहे. पण त्या ठिकाणी जबर श्रध्दा ठेवावी लागते, व संपूर्ण साईमय व्हावे लागते. त्याशिवाय असा अजब अनुभव येत नाही.

एका गुरूवारी संध्याकाळी आरती झाल्यानंतर ७ वाजता एक मुलगी आली, व ती श्रीसाईबाबांचे प्रतिमेस व गादीला नमस्कार करून म्हणाली की बाबा माझे भावावर भयंकर आरोप आला आहे., व तो सध्या अगदी महान संकटात आहे. त्या वेळी मी शांत चित्ताने श्रीसाईबाबांना प्रार्थना केली व तिला माझे मुखाने श्रीबाबांनी सांगितले की "तुझा भाऊ नक्कीच निर्दोष सुटेल, तू काही काळजी करु नकोस" श्री साईबाबा सत्याचे वाली आहेत व सत्य गोष्टी त्यांना फार प्रिय असतात व सत्यवान लोकाना त्यांनी काळेच्या दाढेतून ओढून आणले आहे असा त्यांचा लौकिक आहे; व तो लौकिक त्यांनी ह्या प्रकरणात अगदी सत्य करुन दाखविला. आम्ही सर्वजण चकित व आनंदी झालो. त्या मुलीस माझेमार्फत श्री साईबाबांनी सांगितले की दर गुरुवारी संध्याकाळी यावयाचे व श्री साईबाबांची उदी व खडी साखर प्रसाद घेऊन जावयाचे व तुझे भावास द्यावयाचे. त्यांनी रोज त्याचे सेवन करुन सारखे श्री साईबाबांचे चिंतन करून त्यांना सारखे आळवावे एवढे केले तर श्री बाबा फार दयाळू आहेत. ते तुझे भावास नक्कीच संकट मुक्त करतील. ते दोषमुक्त होतील. भाऊही फार समंजस चांगला सुशिक्षित पदवीधर असून नोकरदार आहे. पण काळाने त्याचेवर झडप घातल्यामुळे ते हवालदील झाले होते. पण अशा परिस्थितीत त्यांना श्री साईबाबांनी दिलासा दिला. व त्या मुलाने जिद्दीने तिचे भावास श्री साईबाबांचा प्रसाद ठरल्याप्रमाणे पोहचता केला व त्या गृहस्थाने श्री बाबांचेवर विश्वास ठेवून ते त्याप्रमाणेच वागले. जवळ जवळ ५ ते ७ आठवडे दर गुरूवारी येऊन त्या मुलीने खटल्याची प्रगती सांगायची व उदी व प्रसाद घेऊन जावयाचे असे सारखे चालले होते. होता होता सर्व केसचे काम अगदी योग्य होत गेले व शेवटी श्री साईबाबांनी सांगितलेल्या योग्य तारखेस व गुरूवारीच या प्रकरणाचा निकाल लागून ते संपूर्ण

निर्दोष म्हणून मुक्तता झाली. ते आनंदी झाले. तो पर्यंत माझी व त्यांची ओळख नव्हती. फक्त आलेल्या भक्तास योग्य मार्गदर्शन करणे, श्री बाबांचे पुढे साकडे टाकणे व त्यांची संकटातून मुक्तता होण्यासाठी श्री बाबांची उदी देणे हे नेहमी प्रमाणे चालले होते. ते निर्दोष म्हणून संकटमुक्त झाल्यानंतर लगेच त्याच दिवशी संध्याकाळी श्री साईबाबांना पेढे व दक्षणा देऊन व आदराने व नम्रतेने नमस्कार करुन गेले,

ह्या केस बाबत सर्व लोक म्हणत होते की या माणसास जबर शिक्षा झाल्याशिवाय रहाणार नाही. पण हे लौकिक दृष्टया जरी खरे असेल तरी श्री साईबाबांचे दृष्टीने ते खरे नव्हते त्यांचे पुढे जो लीन झाला व जे सत्य आहे, त्यालाच श्री साईबाबा काळाचे दाढेतून मुक्त करतात हे सिद्ध झाले आहे. असा हा अजब अनुभव आहे. ●

# पुत्ररत्नाचा लाभ

— पी. आर. जोशी
१६२ शनिवार पेठ, ओसरवाडा पुणे ३०

माझे वय सध्या ६६ चालू आहे. मला दहा वर्षे मुलबाळ नव्हते. माझे पूर्वी १९४० ते ५० पर्यंत पुणे येथे [कापडाचे दुकान होते, त्यावेळी माझे एक साईभक्त स्नेही माझेकडे मधून मधून येत असत, व मला नेहमी म्हणत की, जोशीबुवा, एकदा आपण शिरडीला जाऊ प्रार्थना करु; म्हणजे तुम्हाला अपत्ये होतील. परंतु आमच्या घराण्यात पूर्वी पासून दत्तभक्ती असल्याने, माझे श्रीगुरुचरित्र सप्ताह, पारायणे, शिवलिलामृत वगैरे चालू होतीच. मी म्हणालो, शिरडीचे कोण साईबाबा? (मला त्यापूर्वी त्यांची काहीच माहिती नव्हती) त्यांचेकडे जाऊन अशी मुले होतील तर, वगैरे वगैरे तेव्हा घरची पूजा, सप्ते, एकादशणी वगैरेनी काय होईल ते होवो अशा श्रद्धेने व्यवसाय सांभाळून सर्व चालू होते, परंतु एकदा असे झाले की त्यावेळी तेच माझे स्नेही अकस्मात माझेकडे आले व म्हणाले की, तुम्हाला दुकानदारीमुळे येणे जमत नसेल तर (कारण त्यावेळी दुकान भागीदारीत असल्याने व आता प्रमाणे पुणे शिरडी एस. टी. नसल्याने एका दिवसात जाऊन येणे सुट्टीच्या दिवशी शक्य नव्हते.) आम्ही काही मंडळी स्पेशल टॅक्सी-ने, ३/४ दिवसात जाणार आहोत., तेव्हा वहिनीना घेऊन जाऊ व दर्शन करुन परत येऊ, –मी– हो, म्हटले परंतु त्यावेळेपासून रात्रंदिवस मी सारखा मनातल्या मनात विचार करुन म्हणत होतो की खरोखरच जर, जे कोणी साईबाबा असतील तर त्यांनी मला याच महिन्या पासून नऊ महिन्यानी मुलगा द्यावा, तर मी मानीन, अर्थात ३/४

दिवसांनी स्नेह्यांचे जाणे काही झाले नाही. परंतु माझे शब्द बाबांनी प्रेमाने ऐकून खरो-खरच ९ महिन्यानी पुत्र प्राप्ती झाली, व मला बाबांचे समोर, पाय धरुन मान खाली घालून क्षमा मागावी लागली. बारसे गुरुवारीच झाले, रघुनाथ नाव ठेवले, व तीन महि-न्यानी मंडळीसह शिरडीला जाऊन, जावळ काढण्याचा कार्यक्रम त्यांच्याच दरबारात केला. व पुन्हा आशीर्वाद घेऊन परतलो.

ह्याच मुलाच्या मुंजीच्या वेळी माझे कापडदुकान रस्तारुंदीमुळे बंद करावे लागले. परिस्थिती फारच गंभीर झाली होती. त्यामुळे मुंज करणे सुद्धा कठीण जात होते. धर्मात मुंज लावावी असे मनात येत होते. इतक्यात एका वृद्ध भिक्षुकाने सांगितले की, मी मुलाची मुंज लावुन देतो. दोन दिवस होम हवन वगैरे वगैरे व्यवस्थित करा व मला जे काय तुम्ही द्याल ते मी घेईन. माझी त्यावेळी एकच खोली होती. परंतु माझ्या पुतण्याकडे चार खोल्या होत्या. तेव्हा तेथेच मुंज करावयाचे ठरविले. त्याप्रमाणे मी माझी खोली सोडताना बाबांच्या मोठ्या फोटोसमोर व आमच्या हरिहरेश्वर व जोगेश्वरी कुलदेवतेसमोर पाट मांडून पूजा करुन आमंत्रण केले. व दुसरे दिवशी पुतण्याकडून संध्याकाळी होमहवन वगैरे, मुंज आटपून घरी आलो. तो चमत्कार असा की, देवासमोरच्या पाटावर एक रुपया व हळदकुंकु फुले दृष्टीस पडली. त्यामुळे मला फारच आश्चर्य वाटले; व कल्पना-तीत आनंद झाला, व बाबा प्रत्यक्ष येऊन गेल्याचे अनुभवले. तो रुपया मी जपून ठेवला आहे.

# कोकणी विद्या पळाली

**श्री. कालीदास रांगोळे**
डाकबंगल्याजवळ, कोपरगाव

मी मुंबई येथे सन १९६४ ते १९६६ पर्यंत "नेपीयन्सी रोड" वरील राजरत्न श्री राजगुरु दादासाहेब पंडीत. [डॉ. वसंतकुमार पंडीत, अध्यक्ष महाराष्ट्र जनसंघ] ह्यांच्या बंगल्यात श्री. "सप्तर्षी वकील" ह्यांच्या घरात रहात होतो.

वडाळा येथील "ॲक्मे मॅन्युफॅक्चरींग कंपनी" त जॉब इनस्पेक्टर म्हणून कामास होतो.

चांगल्या वातावरणात रहात असून नोकरीही चांगली मिळाली असताना केवळ नशीबाचा भोग म्हणूनच की काय अनपेक्षितपणे "कोकणी विद्येचा" फटका बसून मला अतिशय त्रास झाला.

मी फार आजारी पडलो. नंतर कोपरगावी आलो. कोपरगावी मी घरच्या सर्व लोकांना त्रास दिला. त्या चक्रात मी भाऊ, बहीण व नातेवाईक, इतर सर्व लोकाना त्रास दिला.

ह्या त्रासामुळे मी सर्वांना अगदी नकोसा झालो होतो. त्या चक्रात मी नाही ते उद्योग करावयाचो व सर्वांशी वाईटपणा घेऊन सारखा मुंबईचा विचार करुन त्या ठिकाणी जाऊनही काही न करता परत यायचो.

अशी ७ वर्षे मी सतत त्रास भोगला. सर्वजण मला फार फार कंटाळले होते.

मलाही काहीच सुचेना. वडिलांनीही सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले. परंतु काहीच उपयोग होईना.

अखेर माझी सर्वांत लहान बहीण ही 'रासने' कुटुंबात दिलेली आहे. हे सर्व कुटुंब "साईभक्त असून श्री. साईलीला अध्याय ५२ मध्ये रासने कुटुंबाचा उल्लेख ही आहे.

त्या घरातील श्री. नानासाहेब रासने हे सतत शिर्डी येथेच असतात. त्यांना ३२ नंबरची गुरुस्थान या जागे मागची खोली असते. त्यांच्याकडे मी जाऊन त्यांच्याच प्रेरणेने मी बाबांची सेवा करु लागलो.

मला शांतता वाटू लागली, आणि मी माझी सेवा जास्त वाढवली. मी कोपरगावाहून पायी शिर्डीस जाऊन 'द्वारकामाईत' चिंतन करीत बसे. बाबांपाशी हा त्रास मिटावा म्हणून सारखी प्रार्थना करीत असे.

असेच एका गुरुवारी सकाळी द्वारकामाईत चिंतन करीत बसलो असताना मला बाबांनी ७ वर्षांचे संपूर्ण चक्कर दाखविले व शेवटी अगदी जोरात मला धरणीवर आपटून मला एकदम जागे केले.

डोळे उघडे करुन पाहातो तर श्री. नानासाहेब रासने माझ्यासमोर असून त्यांनी मला उदी लावून बाबांचा प्रसाद दिला.

म्हणजेच बाबांच्या सेवेने संपूर्ण चक्र आता संपले आहे अशी खात्री करुन मी आनंदाने कोपरगावी आलो.

माझी सेवा वाढत गेली व मी नवस केल्याप्रमाणे दर रामनवमीस एक अर्धा तास तरी बाबांची सेवा मनोभावनेने करतो.

आता यापुढील सर्व घटना त्या बाबांच्याच प्रेरणेने घडत आहेत व अनेक लहानमोठे खूप अनुभव मला प्रत्ययास येत आहेत.

" बाबांवर विश्वास आणि संपूर्ण श्रद्धा जर ठेवली तर बाबांचा संपूर्ण आशीर्वाद आपल्या पाठीशी सतत असतो, हा अनुभव मला वारंवार येत आहे."

"बाबांच्या कृपेमुळेच माझा कोकणी विद्येचा फटका आपोआप कमी होऊन मला एक नवीन प्रकारचे जीवन बाबांनी दिले आहे.

बाबांची सेवा करण्याची संधी मला मिळाली यातच मी माझे भाग्य समजून बाबांचे आशीर्वाद आयुष्यभर विसरणार नाही, अन् नित्यनेमे सेवा करीत माझे जीवन या बाबांच्या चरणी अर्पण करून माझ्या हातून चांगली सेवा घडो अशी मी प्रार्थना करतो.

# विंचू दंशावर उत्तम उपाय–उदी

– भ. धों. कुंभकर्ण,
मुदखेड

● मागच्या वैशाख महिन्यातील दिवस. माझ्या मेव्हण्याच्या लग्नासाठी माझ्या सौ.ला घेऊन जाण्यासाठी स्वतः मेव्हुणा आला होता व आम्ही सर्व मुदखेड रेल्वे स्टेशनवर काचीगुडा-खंडवा गाडीची वसमतला जाण्यासाठी वाट पहात होतो. गाडी अर्थातच तीन तास लेट होती. त्यामुळे तिकीटे वगैरे काढून गाडीची वाट पहाण्या-शिवाय गत्यंतर नव्हते. मुले वगैरे रात्रीची वेळ असल्यामुळे झोपी गेली होती. मोठा संजय व धाकटा धनंजय दोन्हीही पत्नीच्या मांडीवरच झोपलेली असल्यामुळे चि. संजयला खाली अंथरुण टाकून झोपवण्यासाठी सांगितले व त्या प्रमाणे संजयला खाली अंथरूण टाकून झोपवले व आम्ही बोलत बसलो.

इतक्यात चि. संजयच्या अंथरुणावर काहीतरी चढत असल्याचा भास झाला व तसे मी पत्नीजवळ सांगितले. तोच तिने चढणाऱ्या वस्तूला डाव्या हाताने दूर ढकलले, व ढकलताना सौ. पुष्पाच्या हाताच्या अंगठ्याजवळील बोटाला वृश्चिकदंश झाला. काय आहे ते टॉर्चच्या प्रकाशात पाहिले व तेथेच त्याची शांती केली.

आता काय उपाय योजना करावी या विचारात मी असताना मला आठवले की माझ्याजवळ उदीची डबी आहे. उदीने वृश्चिक-विष लवकर उतरते अशी प्रत्येकाची खात्री आहे. आपणही तो उपाय करून पहावा म्हणून मी डबी काढून त्यातील उदी दंश केलेल्या ठिकाणी चोळून लावली, आणि काय आश्चर्य! उदी लावताक्षणीच वर गेलेल्या मुंग्या (विष) क्षणात दंशाच्या ठिकाणी आल्या व आग लागलीच थांबली. तिला

विचारले तर म्हणाली की आता फक्त दंश केलेल्या जागेवर थोडीशी कणकण आहे. मी म्हटले; साईनाम जपावे थोडीशी उदी परत त्या जागी लावली. काही वेळातच त्या ठिकाणची सुद्धा आग थांबली. मी विचार केला, आज माझ्याजवळ जर उदी नसती तर लग्नाच्या कामात व्यत्यय आला असता. तसेच सौ. पुष्पाला त्रास झाला असता तो निराळाच.

उदीच्या रुपाने श्रीसाईबाबा नेहमी माझ्या सन्निध असतात हेच सिद्ध होते.

या उदीमुळे मला बऱ्याच वेळा, मानसिक ताणाचा जो त्रास होता तो कमी झाला आहे, बऱ्याच संकटातून माझी मुक्तता झाली आहे.

मला क्षणोक्षणी बाबांचे अनुभव येतात. ते लिहित बसले तर खूपच मोठी अनुक्रमणिका होईल व ते आठवणार सुद्धा नाहीत.

एकूण " नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य "

ही साईबाबांची उक्ती अक्षरशः खरी आहे व त्याची प्रचिती दररोज क्षणोक्षणी येते. फक्त बाबांवरती माणसाची निष्ठा व जवळ सबूरी ही असली पाहिजे.

उदी आहे माझ्या संगे
आधिव्याधी संकट पांगे ॥

उदी माझी सांगातीण
विसंबेना एक क्षण
उद्धरती ती सर्वांगे ॥

उदी संगाचे काय सुख
बाबा दिसती हो सन्मुख
साई, साई, चिंतनाच्या ढंगे ॥

उदीवरती पडता हात
बाबा उभे की नेत्रात
साईशाचा आशिष मागे ॥

द्वारकामाई निंबतरु
मूर्त बाबा, कल्पतरु
साईबाचा ललाटी डोई, उदीमिश्रित हस्त मागे ॥

*

# साईबाबांच्या कृपेचा अनुभव

– सी. एच. ढापरे
मु. पोस्ट फणसा, स्टे. भिलाड,
जिल्हा वलसाड (गुजरात राज्य)

● मी व आमचे सर्व कुटुंब श्रीबाबांचे निस्सीम भक्त असून आमची सर्वांची श्रीबाबांचेवर पूर्ण भक्ती व श्रद्धा आहे.

मी गुजरात राज्यात तलाठी कममंत्री म्हणून नोकरी करीत आहे. सन १९७२ चे नोव्हेंबर महिन्यात माझी वृद्ध मातोश्री ब्लडप्रेशरने व अर्धांगवाताने आमचे राहत्या स्वगृही म्हणजे खत्तलवाडा, (स्टेशन संजाण तालुका उंबरगाम) येथे आजारी झाल्या हे वृत्त समजल्यावरुन मी माझे कुटुंबियांसह घरी मातोश्रीचे सेवेसाठी हजर राहिलो. त्या आजारीपणात मातोश्रीची शुद्धी व बोलणे बंद झालेले होते

ज्या दिवशी मातोश्रीचे आजारीपण अधिक होत गेले त्याच सुमारास म्हणजे दिनांक १३ नोव्हेंबर १९७२ रोजी दुपारी आमचे तालुका पंचायत अधिकारी, माझे घरी येऊन मजला सांगू लागले की, तुमच्या ग्रामपंचायतीची निवडणूक जी प्रथम रद्द करणेत आलेली होती ती रद्द न होता निवडणूक होणार आहे असा सरकारी आदेश आलेला आहे. त्यानुसार तुमच्या पंचायतीचे नॉमिनेशन फॉर्म भरण्याची मुदत तात्कालिक आहे म्हणून आपण कसेही करून आपल्या नोकरीचे गावी हजर राहून ह्या बाबतची कामगिरी करून यावे असे तोंडी सांगून गेले. निवडणूक कामगिरी म्हणजे अत्यंत महत्त्वाचे. ऐन समयी दुसरा इसम जाऊन फारसा उपयोग होणार नाही. हे समजून माझी मनःस्थिती भांबावली. इकडे मातोश्री मृत्यूशयेवर म्हटले तरी चालेल, काय करावे हे सुचेना. शेवटी श्रीबाबांचा धावा व प्रार्थना करून मातोश्रीस नमस्कार करून घर मोठ्या जड पावलाने सोडून नोकरीचे गावी जाऊन माझे व्यवसाय मित्र श्रीयुत महेंद्र राणा यांचे मदतीने निवडणूक बाबतची कामगिरी आटपून दुसरे दिवशी दिनांक १४ नोव्हेंबर १९७२ रोजी सकाळी मातोश्रीचे सेवेस हजर राहिलो. त्याच दिवशी रात्रौ मातोश्रीचे दुखणे अधिक होऊन दिनांक १४ नोव्हेंबर १९७२ रोजी तिला पहाटेस देवाज्ञा झाली. तात्पर्य श्री बाबांच्या कृपेमुळे मजला माझे सरकारी काम आटोपून मातोश्रीचे सेवेस हजर राहता येऊन मृत्यूसमयी उपस्थित राहता आले. नाहीतर ही घटना आदल्या दिवशीचे रात्रौ झाली असती तर मजला मातोश्रीचे "मृत्यूसमयीचे" गैर हजेरीबाबत पश्चाताप झाला असता नाही का ?

खरोखर माझेवर ही श्रीसाईबाबांची कृपादृष्टीची लीला आहे काय ?

# माझे साईबाबा

- काशिनाथ लक्केवार, मध्यप्रदेश

● आठ-दहा वर्षापूर्वीची गोष्ट. आम्हाला "श्रीसाईबाबा" बद्दल काहीच कल्पना नव्हती. किंवा कुणाकडे सुद्धा फोटो किंवा प्रसादाला आम्ही गेलो नव्हतो. घरगुती सामन खरीदताना, असेच एक दिवस सामान घेता घेता मी एका गल्लीतून फिरलो. तेव्हा मला एका "फ्रेम मेकरच्या" दुकानात समोरच एक चित्र माझ्याकडे दोन डोळे रोखून पाहत असल्याचा भास झाला. खरं वाटेना, म्हणून मी थोडा आड मार्गावर गेलो. त्या फोटोचे निरीक्षण केले. तेव्हा निश्चितच मला वाटले, डोळे माझ्याकडेच पाहत आहेत. चेहरा समजत नव्हता. डोळे मात्र, मी जिकडे जात होतो, तिकडे माझ्याच कडे वळताना दिसत होते. सरकत होते. चित्रातले रंग व पूर्ण आकाराचा फोटो सुंदर होता. माझे लक्ष नुसते डोळ्यांच्या हालचालीवर होते. नक्कीच डोळे, मी ज्या भागाला सरकत होतो त्या दिशेस वळत होते. नेम माझ्यावर होता, मी त्या अद्भुत चमत्कारावर भारावलो. आर्त संवेदना म्हणाली "चित्र सुंदर आहे. आपल्याचकडे पाहत आहे". तेव्हा मनात पूर्ण कल्पना नसतानासुद्धा ते घेतले पाहिजे असे अंतःकरणपूर्वक वाटले. विकणाऱ्या दुकानदारास त्या फोटोची मी किंमत विचारली. नक्की आठवत नाही पण बहुतेक चार किंवा साडेचार रुपये त्यांनी किंमत सांगितली.

त्या दिवसात किंमत मोठी वाटली तरी इच्छा प्रबळ होती. मी ते विकत घ्यायला तयार झालो. पैसे द्यायला लागलो. तर 'फ्रेम मेकर' म्हणाला "हे दुसऱ्याला विकले गेले आहे, द्यायचे नाही." मी उदास झालो. परत येऊ लागलो. वळलो. इच्छा तीव्र झाली. कसं ही करून "हे डोळे" आपल्या स्वाधीन घ्यावे, अशी मनोमन तीव्र इच्छा झाली. नाव, गाव, देव काहीच माहीत नाही. पण डोळे मात्र विलक्षण. नेत्र नेत्रा करिता तळमळू लागले.

"सगुण निर्गुण दोन्ही विलक्षण"

दुकानदारास त्या किंमतीपेक्षा पुन्हा जास्त किंमत देऊ लागलो. मग त्याला काय वाटले, कुणास ठाऊक ! पण थोड्या वेळानंतर त्याने ही "नयना" माझ्या स्वाधीन केली. फार फार आनंद झाला. घरात येऊन मी चित्रकाराच्या (श्री. मुळगांवकर) रंगा-विषयी व डोळ्याविषयी बोलू लागलो. कारण चित्र कुणाचे ते कळले नव्हते. पूजापाठ काहीच येत नव्हते. माहीत नव्हते. त्या "नयन मनोहराला" चांगल्या उंच ठिकाणी कोपऱ्यात लावून घरात शोभा आणली. स्वप्नी काही दिसत होते, सांगत होते. पण

दिवसा झोप उडाल्यावर काहीच आठवत नव्हते. धीरे धीरे घरात आपोआप आरती होऊ लागली. मनात येईल ती आरती. निश्चित काहीच नाही.

काही दिवसानंतर लोकांकडून कळले, हे फोटो म्हणजे शिरडीचे श्री साई महाराज आहेत. श्रद्धा व शांती वाढायला लागली.

घरात प्रसन्नता बरीच वाढायला लागली. म्हणतात ना ग्रहयोग कुणाला सोडत नाही. सुखा मागून दुःख व दुःखानंतर सुख येतात. त्याचप्रमाणे माझ्या सुंदर कुटुंबात "राहूचा" कलह योग वाढू लागला. दशा राहूची होती, कष्ट वाढत गेले. पतिपत्नीत पटेनासे झाले. वातावरण तंग झाले. बाबांना दोष देऊ लागले. की तुमच्यावर श्रद्धा व निष्ठा असताना किंवा तुमचे घरी अस्तित्व असताना घर अशांत का? श्रद्धा मात्र ढळली नाही, निष्ठा संपली नाही. पण रुसणे फुगणे वाढले. नित्य नेम दिवा चुकू लागला.

सद्‌गुरुंशी अबोल झाली ही सितार! करून, दुःखी, निराधार अशी ही सितार बरेच दिवस हेलखावे खात राहिली.

दृष्ट लागले या संसारा
बंद झाला वारा
काय करू मी सारा
सोसवेना राहू केतूचा मारा, गुरुवरा.
दोन्ही अंतर्यामी दुःखी झाला
भंगली यातना
दुभंगले जीवन
जी, झाले वन
उदास दुःखी मन

अशात तिसरा मुलगा विनय पुष्कळ दिवसपर्यंत आजारी राहिला. औषध-पाणी सर्व व्यर्थ गेले. मोठ मोठाले वैद्य, डॉक्टर निरुपाय झाले व दुर्दैवाने नागपंचमीला तीन वर्षानंतर तो मुलगा वारला. दशा अधिक झाली. तिन वर्षात बरेच वेळा अन्न तोंडापर्यंत नेऊन सुद्धा व्यवस्थित जेवायला मिळत नव्हते.

हवा पालट व घरात थोडे परिवर्तन म्हणून आम्ही शेगांव, शिर्डी, मुंबईला निघालो. साई दरबारी दर्शन झाले!

नाही ज्याला आधार
रडे तो त्या दरबार
मंदिरी त्या गाभाऱ्यात
रडे साई सूर

नयनी पाझर
अंतर्यामी निराधार !

बराच वेळ शुभ्र मूर्तीस पाहात राहलो. दर्शन झाले. दोन दिवसा नंतर आम्ही शिर्डी सोडली. मुंबईला काही दिवस राहिल्या नंतर सौ. ला तिच्या माहेरी चंद्रपूरला नेले. काही दिवस तिथे राहिल्यानंतर आम्ही मुलाबाळांसहित आपल्या गावा करिता थोडे सुख दुःखाचे मिश्रित वातावरण घेऊन परत येऊ लागलो.

गाडी लहान, चंद्रपूर गोंदीया लाईन. छोटे छोटेसे गाव. अशाच प्रसंगी एका लहान स्टेशनावर एक साधु आमच्या डब्यात प्रविष्ठ झाले मूर्ति हुबे हूब "श्रीसाई" ! प्रथमतःच माझे लक्ष त्यांच्या वहाणावर पडले. पाहतो तर काय, एक उत्तम कलाकृतीचे नक्षीदार वहाण (चपला) धारण करणारे स्वामी हसत हसत "मी येथे बसू का म्हणून म्हणू लागले." मागासलेल्या गावठी स्टेशनावर अशी कलाकृत्ती कशी काय उसन्न झाली असे आश्चर्य मनात येत नाही तोच मी माझ्या मंडळीना "बाबा साईच" आले असे म्हटले. कदाचित माझ्या नयनाना भास झाला असेल, पण तेच रूप आम्हा चौघांना एकाच वेळेस सारखेच दिसले. डोक्यावरची ती पट्टी, तो फेटा, ती त्याच्या डाव्या कडील गाठ, काही फरक नव्हता. पाहिलेली स्मृति अगदी तंतोतंत अजून आठवते. सावध होई - कोर मनाची. मिटल्या नयनी, रंग हसली मधुरा ! आत्म रंगी रंगले, चरणी नेत्र गुंतले.

"सतत रमवी जे मनांस, ज्यांत सकळ सुखनिवास"

असे हे स्वामी स्टेशन केळझर ते नागभीड पर्यंत प्रत्यक्ष आमच्या बरोबर होते. आमच्या बरोबर त्यांनी केळींचे सेवन केले.

"नका विचारूं देव कसा देव असे हो भाव तसा ऽ नका विचारूं देव कसा !"

गप्पा रंगल्या- एकमेकांच्या, तारा छेडल्या गेल्या.

"काम धाम संसार विसरलो
हरि भजनी रंगली राधिका ऽ

काही वेळानंतर त्यांनी एक छापील कागद दाखविला. दुर्दैव आमचे; डोक्यात प्रकाश पडला नाही. पूर्ण वाचन केले नाही. लक्षात येते की एकाग्रतेने कोणत्याही देवाचे नाव रोज कमीत कमी एक कागद पूर्ण भरून लिहील जा म्हणजे सेवा होईल. नंतर त्यांनी मला फक्त दोन रुपये मिळतील का म्हणून विचारले, व मी हो म्हणताच आनंद प्रदर्शन केले. नंतर ते कुणालाच दिसले नाहीत.

"रघुपती अपुल्या पदस्पर्शाने
पावन मज केले"

माझ्या लक्षात काहीच आले नाही. पण काही दिवसानंतर मला एकदम आठवण झाली की माझ्या एका मित्राने मला दोन रूपये "दरबारात" द्यायला सांगितले होते. ते मी कदाचित भान नसल्यामुळे विसरलो आणि ते मिळविण्याकरिता बहुतेक बाबांनी कष्टच घेतले नाही तर त्यांनी आम्हाला दर्शनसुद्धा दिले. त्या मित्राचे आणि आमचे सौभाग्यच असले पाहिजे.

"या मीरेचे भाग्य उजळले, गिरीधर माझ्या नयनी आले!"

शिर्डीहून परत येताना सोबत काही मूर्ति नेल्या, भक्त म्हणून माझ्या एका श्री व्यंकटेश साहेबांना मी मूर्ति भेट म्हणून दिली. तेव्हा त्याचे उद्‌गार लक्षात घेण्यासारखे आहेत. "कल बाबा, घर आ रहा हूँ, कहे थे, तो वह यही हैं। मेरे स्वप्न में तो यही रुप था।"

लागुनिया तुझे चरण
घर झाले हे पावन
इडा पिडा जाती पळून
ह्रदय विकसले ऽ
भाग्य उजळले ऽ तुझे चरण पाहिले ऽ ॥
चरण पाहिले ऽ

# बाबाच डॉक्टर रूपाने आले

– सौ. उषा कर्णिक
दिवाणजी वाडा, भद्र अहमदाबाद

● माझे पती सुभाष कर्णिक हे चाळीशीतील आहेत. त्यांना या वयातच डोळ्याला मोतिबिंदु आला व तो परीपक्व झाल्यामुळे त्याचे ऑप्रेशन करावे लागणार हे निदान नक्की झाले. त्याप्रमाणे एका मोठ्या डोळ्याच्या स्पेशालीस्टकडून ते करण्याचे ठरविले व २४ नोव्हेंम्बर हा दिवस पण नक्की केला.

ठरल्या दिवशी ऑप्रेशन पार पडले. मी त्यांच्याजवळ रहात होते. रोज डॉक्टर ठरल्या वेळेस पेशन्ट तपासण्यास येत. सकाळी १० नंतर व रात्री आठ, नवानंतरही खेप नक्कीच होती. त्यातुन ते आठवड्यातून दोन दिवस बाहेरगावी जात व त्या दिवशी ते रात्री खास उशिराच येत.

ऑप्रेशन चांगले झाले. ४।५ दिवसानी त्यांच्या एका डोळ्याची पट्टी सोडली गेली. ऑप्रेशन छान झाले होते. त्यांना आता दिसत होते. ६ व्या दिवशी डॉक्टरने त्यांना काळा चश्मा आणण्यास सांगितले व डोळ्याला जरापण धक्का लागणार नाही अशी दक्षता घेण्याची सुचना दिली, व ते निधुन गेले.

डोळा उघडला गेल्याकारणाने डोळ्यातून सारखे पाणी वहात होते व ते सारखे सावधगिरीने पुसावे लागत होते. असे करता करता संध्याकाळचा ६चा सुमार झाला असेल, त्यावेळी त्यांचे मित्र श्री. चोकसी त्यांना भेटण्यास आले व दोघेही गोष्टी करण्यात दंग झाले असतानाच ते जोरात ओरडले. त्यांचे ओरडणे ऐकून मी व श्री. चोकसी दोघे घाबरुन गेलो. ते तर ओरडच होते की माझ्या डोळ्याला भयंकर ठणका लागला आहे. मला सहन होत नाही. माझा डोळा गेला, मी आता आंधळा झालो, आता आपले कसे होणार ? व त्यांना लगेच लो ब्लड प्रेशर झाले. सर्व अंगाला घाम सुटला शरीर गार पडले. व त्यामुळे खोलीतील सर्वच पेशन्ट घाबरले, पंखा सुरू करावा असे वाटत होते पण थंडी भयंकर होती, त्यामुळे पंखा कसा चालवणार, परंतु सर्वांनीच सांगितले की आम्ही अंगावर घेतो, पण पंखा चालवा त्या प्रमाणे केले, व मी नर्सला बोलवण्यास धाडले. ती आली, तिने डोळा पाहिला आणि ती एकदम घाबरली. कारण डोळा रक्ताने भरला होता. असे कशाने झालं विचारता, कळलं की गोष्टीच्या ओघात पाणी पुसता पुसता बोट जरासे चश्माच्या आत घुसले व डोळयात गेले.

तो दिवस डॉक्टरांचा बाहेरगावी जाण्याचा होता. म्हणजे डॉक्टर लौकर येणे शक्य नव्हते आणि डॉक्टरांशिवाय कोणी काहीच करू शकणार नव्हते. तेवढ्यात ह्यांनी परत मला हाक मारली व सांगितले की माझ्या उशीखाली "साई माऊलीची उदी आहे ती आता मला दे. मी त्या प्रमाणे उदीची चिमुट त्यांच्या तोंडात टाकली. थोडी डोक्याला पण लावली. आणि मी उदी लावून वर होऊन माझे डोळे पुसतो तो जिन्या-वर बुटांचा आवाज आला, कोण असेल ? डॉक्टर तर नसतील ना आले, आणि काय मजा पहा डॉक्टर अगदी आमच्या खोलीच्या दरवाजाजवळ आले व सरळ त्यांना काहीएक सांगण्याआधीच ते त्यांच्या जवळ आले व "शुं कर्णिक" असे विचारून डोळा तपासुन औषध वगैरे घातले व इंजेक्शन सुरू करण्यास सांगून आले तसेच परत निघून गेले.

ह्या गोष्टीचे सर्वांनाच नवल वाटले की वेळ त्यांची येण्याची नसताना ते अगदी फोन केल्याप्रमाणे आले व आपले काम उरकून परत नीट काळजी घ्या असे सांगून निघून गेले. हे कसं काय घडले असेल ते फक्त आम्हा दोघानाच माहित की आपले बाबाच डॉक्टर रूपाने आम्हाला मदत करण्यास धावून आले. आमचे सर्वांचे हात त्या "गुरु माऊलीला" न कळत जोडले गेले. आता ह्यांना छान दिसते व ते आता कचेरीत पण जाऊ लागले आहेत.

त्या श्री साईनाथाला कोटी कोटी वंदन !

# श्री साईकृपा

**श्री. नंदकुमार शंकरराव गायकवाड**
ज्योतिर्लिंग हायस्कूल, गुळूंचे
मु. पो. गुळूंचे, ता. पुरंदर
जिल्हा - पुणे.

● यह है मेरी पुरानी कहानी, जब मैं एस्. एस्. सी. होकर भी बेकार था। तब दुनियाने मुझे ठुकराया। मेरी मान मर्यादा छीन ली गयी, लेकीन न जाने वे दिन आज कहाँ गये, ये मुझे भी मालूम नहीं 'यह सब कृपा साईबाबाकी है'। उन्होंने मुझे नया जीवन जीनेका नया मार्ग दिखाया। नया संदेश दिया, वही संदेश मैं आज ही गाता हूँ, गुनगुनाता हूँ।

मैं एस्. एस्. सी. होकर भी बेकार था। अेक दिन हमारे गाँवके महान कार्यकर्ता श्री. विजयसिंह सु. निगडे उर्फ 'विजय बापू' इन्होने मुझे बुलाया। मैं मनमें बहुत घबराया, न जाने मेरे हाथोंसे कोई अन्य कुछ गलती हुअी कि, और कुछ हुआ। इस प्रकार डर लगने लगा, लेकिन बात तो उलटी हो गयी। जब उन्होने मुझे बुलाया मैं अंदर गया। उनके पास ही हायस्कूल के हेडमास्टर साहब बैठे थे। हेडमास्तर साहबके ओर देखकर बापूने कहा "अपने हायस्कूल में जो 'नाईट वॉचमनकी' जगह खाली है, उस जगहपर इसकी ऑर्डर निकालो"। ये शब्द सुनकर मैं मन ही मन बहुत हर्षित हुआ। ऐसा लगा कीं बस मेरी बात मेरे श्रीसाईबाबाने सुनी, मैं हर्षभरीत होकर साईबाबाकी प्रार्थना करने लगा।

१ एप्रिल १९७५ मैं अपने ड्युटीपर हाजिर हुआ। मेरी ड्युटी नाईटकी थी। नाईट ड्युटी करनेका यह मेरा पहला ही वक्त था। मेरे मनमें आया न जाने मेरा कैसा होगा। लेकिन रातभर मैं साईका 'नमन' करने लगा, उसकी प्रार्थना की, बाबाके गीत गाते गुनगुनाते हुअे वह १ एप्रिल १९७५ की रात चल गयी।

मैं ज्योतिर्लिंग हायस्कूल में 'नाईट वॉचमनकी' सर्व्हीस करता हूँ। मैं अपना काम बडे इमानदारी से करता हूँ। जो मेरा फर्ज है उसका पालन मैं अच्छी तरहसे करता हूँ। ऐसा करते, करते एक महिना बीत गया, दुसरा भी चला गया। लेकिन मेरी तनखे की ऑर्डर नही निकली। मैं मनमें थोडासा नाराज हुआ, लेकिन एक मन कहता था की जब तक तुम्हारे पीछे "बाबा है तबतक तुम डरो मत। अपना फर्ज इमानदारीसे करो" उसमे ही तेरी सफलता है। ठीक है मैंने भी इरादा कर लिया और अपना काम जी लगाकर करने लगा। हमारे विद्यालयके मुख्याध्यापक श्री. अमीनगड एम. एम.

उन्होने मुझे धीरज दिया और उन्होंने मुझे एक किताब दिया। वो किताब था ? "साई-स्तोत्र" किताब देते हुअे उन्होंने कहा "देख बेटे नंदु बाबाकी प्रार्थना करो, तुम्हारा काम जरूर हो जायेगा। वही किताब मैं सुब्रह-शाम पढने लगा। न जाने इस किताबमें इतना मन बँसे गया की, मैं वही पंक्तीयाँ गुनगुनाने लगा और आज ही गुनगुनाता हूँ।

"श्री साईनाथ कृपे माझेचित्त ॥
भावी निवांत होईल ॥
जे विविध तापी तापले ॥
ते ते भव बंधन मुक्त झाले" ॥
मनी धन्य झालो झालो
तुझे गीत गाता गाता
प्रभु साईनाथा
प्रभु साईनाथा
मन मानसिया तुझे रुप चित्ती
तुझे नाम ओठी प्रभु साईनाथा ॥धृ॥

# श्रीबाबा माझे पाठीराखे

– श्री. किसनराव वंगाळ
नगरपालिका कार्यालय, धर्माबाद, नांदेड

● किशोर अवस्थेत मानवाला विचित्र असे अनेक छंद असतात, ज्यास मीही अपवाद नाही. मला माझ्या किशोर अवस्थेत वेगवेगळया प्रकारची चित्रे पहाण्याचा छंद होता. रोज सकाळी शाळेत जाताना व संध्याकाळी शाळेतून परत येताना प्रत्येक दुकानातील फ्रेममध्ये लावलेल्या फोटोचे निरीक्षण करणे हा माझा रोजचा-कार्यक्रम होता. सहसा फोटो अनेक देवतांचे होते, त्यात बहुमुखी, अनेक हातांचे इत्यादी होते.

परंतु एक फोटो असा पहावयास मिळाला की, त्यात एक वृद्ध इसम एका दगडावर बसलेला होता, त्यांच्या मागे एक पांढरा घोडा सजलेला समोर जवळ एक कुत्रा, थाळीत नारळ, केळी वगैरे हे वृद्ध इसम डोक्यावर कफनी, लांब अंगरखा, त्या अंगरख्याची

उजव्या हाताची अस्तनी थोडीशी त्रिकोणाकृति फाटलेली या पोषाखात होता हा फोटो मला थोडा निरखून पहावेसे वाटत होते. कारण की, सर्व फोटोंपैकी हा फोटो थोडा निराळाच होता. परंतु हे वृद्ध इसम कोण म्हणून त्यावेळी मी चौकशी सुद्धा केली नव्हती, परंतु ह्या वृद्ध इसमाच्या फोटोला जास्त निरखून पाहणे हा माझा दैनंदिन कार्यक्रम झालेला होता.

काही दिवसानी गणेश–उत्सव साजरा करण्यात आला. उत्सव ते विसर्जनापर्यंत १० दिवस रोज काही-ना-काही कार्यक्रम (नाटक, झांकी, गायन-वादन) होत असत. एका गणेश मंडळाने श्री साईबाबांची झांकी केली, व तशी पूर्वसूचना दिली गेली. एका वृद्ध इसमाला श्री साईबाबासारखी वस्त्रे घालून झांकी दाखविण्यात आली. तेव्हा मला त्या फोटो मधील चित्राचा उलगडा कळाला की ते वृद्ध दुसरे कोणी नसून श्री साईबाबा होते.

एक तप झाले हे सर्व काही विसरले गेले, किशोर अवस्थेतून मी तारुण्य अवस्थेत आलो. एकदा माझे वडील त्यांच्या मित्रासह पंढरपूर व तसेच शिरडी स्थानास जाऊन आले. तसे ह्यापूर्वी तिरूपति देवस्थानास गेले होते ,परंतु त्यांच्या दृष्टिकोणातून शिरडी हे स्थळ इतर धार्मिक स्थळापैकी शांत आल्हादकारक वाटले असे सांगितले होते.

त्या वेळेपासून शिरडीस प्रथम भेटीपर्यंत मला दरवेळेला वाटे की मीसुद्धा शिरडीस जावून श्री बाबांचे दर्शन घ्यावे.

मी नांदेडला नव्हेंबर १९६९ बी. ए. प्रथम वर्षात राहिलेला ए.टी.के.टी. चा विषय 'राज्यशास्त्राच्या' पेपरची परिक्षा देण्यास गेलो. मी व माझा मित्र गंगाराम अटकाळे त्यापूर्वीच निश्चित केले होते की, पेपर सुटल्यानंतर सरळ नांदेडहून औरंगाबाद, वेरुळ व अजंठास जावून यावे. पण माझा पेपर अवघड गेल्यामुळे मी निराश झालो व मित्रास यापुढचा कार्यक्रम करण्याचे नाकारले. पण मला तो जबरदस्तीने घेऊन गेलाच. नंतर आम्ही औरंगाबाद, अजंठा, वेरूळ, देवगिरीहून अनपेक्षितपणे शिरडी स्थानी पोहचलो.

पहिल्या प्रथम या पुण्यभूमीवर पाय ठेवल्याने मला एक विचित्र अनुभव व उल्हास आला. मी स्वतःस विसरुन गेलो. स्नानादी आटोपून मंदिरात पाय ठेवला. श्रीबाबा माझ्याकडे पाहून हसू लागले, असा भास झाला. एकदम मला किशोर अवस्थेची स्मृती झाली. तेच फोटोतील बाबा, फक्त मधे घोडा व पुढे कुत्रा नव्हता. बाकी सर्व तसेच. पूर्ण श्रद्धेने मी श्रीबाबांच्या चरणी विलीन झालो. विचित्र अनुभव जे मला केव्हाही व कोठेही आतापर्यंत लाभले नव्हते. दुसऱ्या दिवशी आम्ही श्रीबाबांचा निरोप घेतला. तेव्हा माझी मनःस्थिति अशी झाली की, जेव्हा आईपासून मुलाला वेगळा केल्याप्रमाणे ! रोम–रोम पुलकित झाला. अश्रुलोचनांनी मी श्रीबाबांचा निरोप घेतला व दुःखी मनाने बसस्थानकाकडे प्रस्थान केले.

एका महिन्यानंतर परीक्षा परिणाम कळला. मला अपेक्षासुद्धा नव्हती पास व्हायची, पण पास झालो. मार्क्ससुद्धा ५० टक्के मिळाले. श्रीबाबांचा मला आशीर्वाद लाभला. श्रद्धा दुणावली. मला वाटले की श्रीबाबा माझे पाठीराखे आहेत.

दुसरी माझी व श्रीबाबांची चरणी भेट सन १९७३ मधे. मी स्वतःशी निर्णय घेतला की, जेव्हा जेव्हा औरंगाबादला भेट देण्याचा समय येईल, तेव्हा तेव्हा शिरडीस भेट देईन. मी आणि माझा मित्र विजय कुळकर्णी औरंगाबाद येथे सेलटॅक्स ऑफिसरची परीक्षा देवून सरळ शिरडीस प्रस्थान करण्यास बसस्थानकावर आलो, व तिकीट न काढता बसमध्ये प्रवेश केला. इकडची प्रथा अशी की, प्रवासी बसमध्ये बसल्यानंतर कंडक्टर तिकीट देतो. बसमध्ये प्रवासी टिच भरलेले होते. बसस्थानक सोडले. काही वेळाने एक सद्‌गृहस्थ आपल्या परिवारासह अगदी समोरच्या सीटजवळ आले, जेथे आम्ही बसलो होतो. त्यांनी रिझर्वेशन केले होते, तशी कल्पना आम्हा दोघास दिली. आम्ही दोघानी जागा सोडली. पण एक इसम सीटवर बसला होता, सीट सोडण्यास तयार नव्हता, त्याचे म्हणणे असे होते की, मी ह्या सीटवर पूर्वीच बसलो. हे संभाषण वादग्रस्त झाले. कंडक्टरने येवून त्या इसमास समजावून उठण्यास सांगून त्याची जागा त्या रिझर्व्हेशन सद्‌गृहस्थास देवू केली.

कंडक्टर पुढे आल्यामुळे शिरडीची दोन तिकिटे देण्यास विनंती केली. कंडक्टर एकदम भडकला आणि म्हणाला, विनातिकीट तुम्ही बसमध्ये का चढलात. कंडक्टर महाशयांनी एक घंटी वाजवून बस थांबविली व उतरण्यास सांगितले. विनंती केली की आमची चुक झाली पण महाशय ऐकण्यास तयारच नाही. बसस्थानकापासून जवळ जवळ बस दहा किलोमिटर आलेली होती. प्रश्न उद्‌भला की पुन्हा माघारी जाणे त्रासच पुन्हा एकदा विनंती केली. इतक्यातच एक सद्‌गृहस्थ (जे दिसावयास अधिकारी होते) 'येवला' तिकीट देण्यास कंडक्टरला विनंती केली. ते सुध्दा घाईने विनातिकीट बसमध्ये प्रस्थान केलेले होते. त्या व्यक्तीचा पोशाख व वय पाहून, कंडक्टरने तिकीट दिले. व नाईलाजास्तव आम्हा दोघास तिकीट दिले. मी मनातून श्रीबाबांचे व त्या सद्‌गृहस्थाचे आभार मानले. कारण की ऐन वेळी श्रीबाबांनी आम्हास सहाय्य केले.

आम्ही दोघे मित्र श्रीबाबांचे दर्शन घेऊन दुसऱ्या दिवशी परत निघण्याची तयारी केली, एवढ्यातच माझा मित्र श्री किशन तानूरकर हा अनपेक्षितच पुण्याहून शिरडीस आला व आमची गाठभेट झाली. पुन्हा एकदा आम्ही तिघे मित्र भक्तीभावाने दर्शन घेऊन श्रीबाबांचा निरोप घेतला.

मनमाडची बस धरून प्रवास सुरू केला. बसमध्ये किशन तानूरकरने नाशिक व त्र्यंबकेश्वर जाण्याचा प्रस्ताव केला व आम्ही दोघा मित्रांनी मान्यता दिली व संध्याकाळी

नाशिक स्थानी पोचलो सकाळी त्र्यंबकेश्वरला जावून, नाशिकची धार्मिक स्थळे पाहून आमच्या गावी परतलो. पुन्हा एकदा श्रीबाबांचे दर्शन 'मुक्तिधाम' नाशिकला झाले. श्रीबाबा ह्यांच्या आशीर्वादाने आम्हास 'गोदावरी नदीचे' उगम व मर्यादा पुरुषोत्तम प्रभु श्रीरामचंद्र ज्यांनी १४ वर्षे वनवासात घालविली ते स्थळ 'पंचवटी' आम्हास पहाण्यास मिळाले हे सर्व काही श्रीबाबामुळेच झाले. ह्यापूर्वी आमचा असा काही मानस नव्हता.

# मी आहे तुमचा रक्षक

**श्री. दिनकर सपकाळ,**
तेलीकी बजरीया, नयाबाजार. ग्वाल्हेर

● शिरडीचे साईबाबा भक्तांना कसे सहाय्य करतात त्याची प्रचिती भक्तांना वेळोवेळी होत असते, "तुम्ही माझ्याकडे बघा मी तुमच्याकडे बघेन, मी आहे तोपर्यन्त भीती कसली?" हे बाबांचे अमर वाक्य.

मे १९७५ माझ्या आयुष्यात मी कधी विसरेन असे वाटत नाही कारण! मला थंडी येऊन ताप आला. पहिल्या दिवशी १०४ डिग्री ताप अंगात. घरातल्या कांबळी, रजई, गाद्या अंगावर टाकल्या तरी थंडी म्हणे मी जाणार नाही. साई! साई! करून संध्याकाळी चारच्या सुमारास ताप घाम येऊन उतरला, दुसऱ्या दिवशी ताप नाही. मनाला बरे वाटले. तिसऱ्या दिवशी सकाळी १२ च्या सुमारास ताप पुन्हा थंडी येऊन आला त्यावेळी पूर्ववत तेच प्रकार घडले. असे करून एक दिवसाआड ताप येण्यास प्रारंभ झाला. अशा प्रकारे ५ व्या फेरीत ताप भयंकर रूपाने आला. दुपारी २ ला ताप १०७.५ पर्यंत पोहचला, मी बेशुद्ध झालो. माझ्या कॉटसमोर बाबांचे लहानसे देऊळ आहे. त्यात बाबांच्या दोन मूर्ति व त्याला लागूनच बाबांचे दोन आशीर्वाद फोटो. एक एका बाजूला व दुसरा दुसऱ्या बाजूला व मधे माझ्याजवळ १९४७ पासून असलेला बाबांचा शिळेवर असलेला लहान फोटो, या सहा दिवसात बऱ्याच क्लोरोक्विनटेब्लेट घेतल्या पण त्याचा काही उपयोग झाला नाही, दुर्दैवाने आणलेल्या टेब्लेटस नकली होत्या।

मी दररोज घरात (बाबांची) पूजा झाल्यानंतर श्रीबाबांचे चरणामृत व उदी घेतो, पण ह्या दिवसात आंघोळ न केल्यामुळे ते घेत नव्हतो म्हणून का हे असे होते..

जे सोडले ते घे मग बरा हो, अशी बाबांची आज्ञा असेल असे मला आजही वाटते, जे सोडले त्याचा काही तरी परिणाम पाहिला पाहिजे. त्याचमुळे थोड्या वेळात अर्धवट शुद्धीवर आलो! बाबांच्या फोटोकडे पाहिले मनास वाटले आज जीवनाचा शेवटचा दिवस, कारण अद्याप जीवनात इतका आजारपणा कधी आलेला नाही. पत्नीकडे पाहून आता जमणार नाही असे उद्गारही काढले. तिने उत्तर दिले, 'साई माई आहे तोपर्यंत काही होणार नाही." तिने लगेच बाबांची उदी पाण्यात टाकून पाजली! पुन्हा बेशुद्धी आली, तितक्यात शेजारचे सर्व लोक जमले, हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यास नेण्याची तयारी करू लागले.

माझा थोरला मुलगा माझे मित्र डॉ. निवसरकर यांना बोलविण्यास गेला होता, परंतु ते घरी भेटले नाहीत. तिथेच गायनाकॉलोजीचे प्रोफेसर डॉ. डब्ल्यू. व्ही. वाघ यांचा बंगला आहे, ते ड्यूटीवरून परत आले, त्यांनी मुलाला बघून विचारले, कारे असा का?

तेव्हा त्याने माझी सर्व हकीकत सांगितली, डॉ. वाघ लगेच त्याच्या बरोबर घरी आले. डॉ. नी माझे टेम्परेचर घेतले. १०५ होते. काही गोळया दिल्या व थंड पाण्याच्या पट्या ठेवण्यास सांगितले. ते माझ्याजवळ बसून होते, तेवढ्यात कानात आवाज आला "उठ." मी ताडकन उठून बसलो, बाबांच्या फोटोला नमस्कार केला व तोंडातून सरळ शब्द निघाले आता ठीक आहे! मला काहीही होणार नाही अशी आतून अंगात शक्ति निर्माण झाली, ताप उतरण्यास सुरवात झाली, संध्याकाळपर्यन्त ताप नॉर्मल आला, हे घडले कसे? केवळ साईबाबांच्यामुळे.

माझ्या लहान मुलीचे नाव ममता, वय १२ वर्षे. तिने मी बेशुद्ध असताना माझ्या सर्व अंगाला व डोक्याला बाबांची शिरडीहून आणलेली उदी लावली तेव्हा पासून ताप उतरण्यास प्रारंभ झाला, तिचा विश्वास बाबांनी ठेवला. त्यामुळे तिची श्रद्धा द्विगुणित झाली आहे.

तिच्या श्रद्धेचे कारण असे! भोपाळ स्टेटच्या बेगम ए. डी. सी. श्री फजल मियां ह्यांच्या मोठ्या मुलाचे नाव श्री ताज मियां यांना मोटर-सायकलचा अपघात भोपाळ येथे झाला. न्युरो सर्जन पदमश्री डॉ. आर. एस. धारकरानी त्यांना ग्वाल्हेरच्या जे. ए. हॉस्पिटलमध्ये इलाजाकरीता ग्वालियर येथे आणले. तेव्हा श्री ताज मियां बेशुद्ध होते. त्यांची प्रकृति धोक्यात होती. मध्यप्रदेशाचे विद्युत राज्य मंत्री व वर्तमान शिक्षा राज्य मंत्री माननीय अजीज कुरैशींच्या सूचनेवरून विद्युत विभागातर्फे श्री ताज मियां बरोबर आलेली मंडळींची व्यवस्था करण्याकरिता माझी नेमणूक झाली. त्यांची व्यवस्था करून मी जेवण्यास घरी आलो तेव्हा घरी ह्याबद्दल बोललो आणि त्यांच्या गंभीर

जखमाची ही चर्चा केली. तेव्हा चि. ममताने मला बाबांची उदी दिली व ती श्री ताज-मियांच्या उशीखाली ठेवण्यास सांगितली. हॉस्पिटलमध्ये गेलो. त्यांच्या मातोश्री व श्री फजल मियांस उदी ठेवण्याबद्दल विचारले, त्यापूर्वी श्री साई माऊली, व उदीबद्दल बोललो व ममताच्या दृढ विश्वासांबद्दलही बोललो. चमत्कार असा की सकाळी सहाच्या सुमारास श्री ताज मियांनी "बिआ" करून हाक मारली. "बिआ" म्हणजे आई. त्यावेळी माझे व त्यांचे डोळे भरून आले. श्री ताजच्या डोक्यास भयंकर मार बसला होता, डॉक्टरांचे मत होते की शुद्धीवर येण्यास किंवा बोलण्यास ५,६ दिवस तरी लागतील, पण बाबांनी उदी देऊनच हे सर्व काही फेटाळून लावले. ही आठवण चि. ममताला आली व तिने माझ्यावर उदीचा प्रयोग करून माझ्यावर आलेला धोका टाळला !

श्री ताज मियां त्यानंतर बरे होऊन आता सुखरूप आहेत.

सहाव्या फेरीत ताप येण्याची शंका मनात घोळत होती. परंतु सकाळी १० वाजता "साईलीला" मासिकाचा अंक ( मे १९७५ ) आला, मनात धैर्य आले, जणू ताप पळविण्याकरिता बाबा स्वतः अंक रूपाने आले, त्या दिवशी अंक आला आणि ताप गेला !

भक्तानो ! बाबांचे वाक्य नेहमी लक्षात ठेवा "Why fear when I am near; If you look to me I look to you" हे वाक्य कधीही असत्य होणार नाही. ●

# बोअरिंगमध्ये अडकलेला दत्ता व साई

— श्री. रामचंद्र मल्लेश्वर दमकोंडावार
बल्लारपूर.

● आमचे कुटुंबाचे आद्य दैवत, आधारस्तंभ सर्वेसर्वा कर्ताधर्ता मार्गदर्शक प्रभु साई. बाबाचे अनंत उपकार माझेवर, माझे कुटुंबावर आहेत ज्याची फेड या जगात शक्य नाही. त्यांच्या छत्रछायेखाली आम्ही अगदी स्वच्छंद वातावरणात मार्गक्रमण करीत आहो. त्यांनी आमचे वर केलेले उपकार अगाध आहेत. त्या अनन्त उपकारापैकी एक उदाहरण देत आहो. प्रभु साईनाथाचे मंदीर आमचे घराजवळच १९६२ विजया दशमीचे मुहूर्तावर तयार झाले आहे. ही गोष्ट घडली १०–८–१९७२ रोज गुरुवारी श्रावण शु॥ - प्रतिपदा, वेळ सायं. ४–३० वाजता.

गुरुवारच्या बाबाचे सायंकाळचे आरतीकरिता घरातली मंडळी तयारी करीत होती आमचा लहान मुलगा दत्तात्रय काही कारणास्तव हातपाय धुण्यास पाण्याचे टाक्याव जाऊन हात पाय धुवून घेतले व घरात कपडे घालावयाचे तयारीत होता.

आम्ही घरी बोअरींगचे पाणी घेत होतो. १९७१–७२ चे उन्हाळे या बाजूला खुपच होते. जेणे करून बोअरिंगचे पाणी खोल गेले. जुन्या बोअरींगला खोल करण्याचे उपाय नसल्यामुळे त्याला लागून नऊ इंची डायमेटरचे नवीन बोअरिंग ता. ९–८–७२ ला चालू केले व १०–८–७२ पावेतो ते बारा साडेबारा फूट खोल झाले होते. बोअरिंगचे काम बंद करून ३ वाजता बोअरिंगवाले निघून गेले व त्यावर लहान लाकडाची पाटी झाकून ठेवली.

आमचा दत्ता कपडे घेण्यास घरात येता येता त्या बोअरिंगजवळ उभा राहिला मी त्याचे जवळून १५ फूटावर ऑफिसमध्ये एका सद्‌गृहस्थाबरोबर बोलत होतो. तितक्यात पाटी सरकल्याचा आवाज आला. तिकडे मी पाहतो तर दत्ताचे केस फक्त बसल्या ठिकाणावरून दिसले. धावत जाऊन जवळून पाहातो तर आमचा दत्ता थेट खाली साडेबारा फुटावर जाऊन उभा झाला. त्याचेकडे मी बघण्याशिवाय काही करू शकत नव्हतो आणि करणार तरी काय ? दत्ताचे वय फक्त ३ वर्षं.

सुचले ते एकच दत्ताला बाहेर काढणे न काढणे ते बाबाच जाणे मी त्याला बाबांच्या चरणावर भार ठेऊन, शिरडीवरून आणून घरात ठेवलेल्या उदीपैकी मुठभर उदी सरळ बोअरिंगमध्ये टाकलीच बाबाला आर्जवून सांगीतले बाबा दत्ताला न्यावयाचे असल्यास माझी मनाई नाही पण एकच विनन्ती त्याला एकट्याला नेऊ नका सोबत मीपण तयारी करितो मला अव्हेरू नका व त्याप्रमाणे पुढे काय करू याची पूर्ण तयारी करून बोअरिंग जवळ बसलो. दत्ता आतमधून आवाज देत होता बाबा यानं, बाबा काढानं'' मी मनात म्हणत होतो तुझा बाबा तो साई आहे आज यावेळी मी तुझा कोणीच नाहीं.

गाव मोठे असल्यामुळे सर्वत्र वार्ता पसरली हां हां म्हणता हजारो लोकांची तोबा गर्दी जमली ज्यांना जे सुचेल त्याप्रमाणे सांगतही होते, करीत होते, पोलीसांची कुमक आली आणि गर्दी आटोक्यात आणली.

डॉ. शहा मेडीकल ऑफीसर जवळ बसले पण वरून बघण्याशिवाय काही करू शकत नव्हते. मी बोअरिंग जवळून हालू शकत नव्हतो. तेच काही सज्जन सद्‌गृहस्थानी बोअरिंग जवळून १० फूटाचे अंतरावरून सुरुंग खोदणे चालू केले.

नऊ इंची बोअरमध्ये १२॥ फुटावर दत्ता अगदी फीट उभा आहे. त्याचे डोक्यावर थोडीही माती पडली तरी तो पॅक होणार. पाहता पाहता साडेतीन तास झाले सुरुंग खोदणे चालूच होते. पाच फूट खोल सुरुंग बोअरजवळ आल्यानंतर बोअरिंगच्या ९ इंची बोअरला थोडे थोडे करून त्या बाजूने चिरून काढले परत २॥ फूट खड्डा सुरुंगात करून म्हणजे साडेसात फूटावरून झोपून आत हात टाकून पाहिले तर दत्ताचे डोळे हाताला लागले. मी वरून आवाज दिला बाबा दत्ता हात वर कर. दत्ताने हात वर केले आणि ठिक आठ वाजून पस्तीस मिनीट झाली आणि साईबाबाकी जय या लोकांच्या जय घोषात दत्ता बाहेर आला. डॉक्टर दत्ताची हात धरून नाडी बघतात नाडी व्यवस्थीत होती. मी सांगितले बाबा दत्ता सर्वांना नमस्कार कर. आणि दत्ताने सर्वांना नमस्कार केला मग पुढे त्याला आंघोळ घालून हजारोंच्या संख्येने देवळात नेऊन दर्शन घेतले आणि अशाप्रकारे बाबांनी सर्व बऱ्हाणपूर नगरवासीयाना व सर्वांना स्वःताचे अस्तित्व दाखवून स्तंभीत केले. दत्ताला काहीच म्हणजे अगदी काही सुद्धा झाले नव्हते लागले नव्हते सामान्य स्थितीत होता तब्बल ४ तास तो नऊ इंचीच्या बोअरमध्ये अडकून राहून सुद्धा आमचा दत्ता जसा गेला तसा परत आला. बाबांचे उपकार अनंत आहेत त्यांचे उपकार मी सांगणे अशक्य कोटीतले आहे. आज स्वच्छंद वातावरणात तो वाढत आहे.

बाबांची ही लीला आजही आठवण आल्याबरोबर गद्‌गदून जाऊन अश्रू ओघळतात त्यांच्या उपकाराची फेड या जन्मात शक्य आहे का ! मी त्यांच्या उपकाराचे ढिगाऱ्यात अगदी दबून आहे. ●

## श्रीसाईलीला

### लेखक–कवी संमेलन तिसरे १९७७

येत्या जानेवारीतल्या शेवटच्या आठवड्यात किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात शिर्डीत साजरे होणार. विशेष संपूर्ण माहिती जाने. १९७७ चे अंकात.

३७

## साधु संत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।



पण केवळ साधु संतच नव्हे तर प्रत्यक्ष "रामावतारी" "कृष्णावतारी" "दत्तावतारी" भगवान् सच्चिदानंद सद्गुरू **श्रीसाईबाबा** (शिरडीचे) आपल्या घरी येतील तो तुमच्या आयुष्यातील '**सोनियाचा दिस**' होय.

आजच श्रीसाईबाबांची शीलाखंडावरील पूर्णाकृती पंचधातूची (ब्राँझ) अभंग मूर्ति खरेदी करून आपल्या घरी बाबांना कायमच्या वास्तव्याला बोलवा. मग काय रोज पूजा आरती नैवेद्य म्हणजे जणू काय "**जाहले घराचे मंगल देऊळ !**"

अशा तऱ्हेने साईभक्ताचे प्रत्येक घर हे एक लहान का होईना पण प्रत्यक्ष बाबांचे मंगल देऊळ बनावे अशी इच्छा मनी धरून आम्ही श्रीसाईबाबांची ९ इंच उंच व ५ इंच रुंद अशी पंचधातूची अत्यंत मजबूत अशी मूर्ति बनविली आहे. जिला अगदी लहान मुलांपासूनसुद्धा फारसे जपावे लागत नाही.

मूर्तीचे खास वैशिष्टय म्हणजे ती पंचधातूची व योग्य साईजची बनविल्यामुळे एक तर मूर्ति ताम्हनांत ठेवून तिला सुवासिक अत्तराने अगर पंचामृताने स्नान, अभिषेक घालता येतो. तसेच मूर्तीला डोक्यावर शिरपेच, मुकुट इत्यादि अलंकार व फेटा अगर इतर रंगीबेरंगी पोषाखाने मूर्ति अत्यंत शोभिवंत करून आपल्याला कमालीचे मानसिक समाधान मिळते.

मूर्तीची किमत अत्यंत वाजवी ठेवली आहे !

तसेच श्रद्धावंत भक्तांच्या काही अडचणीही आम्ही लक्षात घेऊन योग्य प्रकारे सहाय्य करू ! बाहेरगावी मूर्ति पोस्टाने अगर व्ही. पी. ने पाठवू.

"मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक डिझाईनचे लाकडी देव्हारे उपलब्ध आहेत."

अधिक माहिती वा इतर तपशिलासाठी प्रत्यक्ष भेटा अगर लिहा :–

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,**

पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७

फोन नंबर : ५७ ६२ ९८. भेटण्याची वेळ : सकाळी ७ ते ९ रात्री ७ ते ९.